**रे.मु.क्र. ६०/२०२१**
CNR No. MHRG080011182021

श्री. चंद्रकांत हरीभाउ शिंदे वगैरे ५
... वि...
श्री. चंदु लक्ष्मण शिंदे वगैरे ४

**निशाणी ४८ वर आदेश**

**१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(अ), (ब) आणि (ड) प्रमाणे दाखल केलेला आहे.

**२.** प्रस्तुतच्या अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे :—

प्रस्तुतचा दावा, जाहीर ठराव, हक्क प्रस्थापन व मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. वादीने महसुल कार्यालयाच्या आदेशावर अपिल केलेले नाही. त्यामुळे ते फेरफार रद्द होत नाही तोपर्यंत या न्यायालयास दावा चालविण्याचा अधिकार नाही. दाव्यास कारण केव्हा, कुठे व कसे घ डले याबाबतचा उल्लेख दाव्यात नाही. त्यामुळे सदरचा दावा मुदतीत नाही. दाव्याचे मुल्यांकन योग्यरितीने केलेले नाही व अपुरा स्टॅम्प लावलेला आहे. कुळ कायद्याविरुध्द कोणताही आदेश करण्याचे अधिकार प्रस्तुत न्यायालयास नाहीत. त्यामुळे प्रस्तुतचा दावा फेटाळण्यात यावा अशी मागणी करण्यात आलेली आहे.

**३.** वादीतर्फे सदर अर्जास निशाणी ५० वर म्हणणे दाखल करण्यात आले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दावा मुदतीत आहे किंवा नाही हा वस्तुस्थिती व कायदा याचा संमिश्र मुद्दा आहे. त्यामुळे तो दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश ७ नियम ११ मध्ये अंतर्भुत होत नाही. दावा मिळकती या कुळ कायद्याअंतर्गत कुळ व सावकार या प्रमाणे किमती ठरवून मिळालेल्या नाहीत. तसेच दावा पॅरा क्र. ८ मध्ये दाव्यास केव्हा व काय कारण घडले याबाबत मजकूर नमूद केलेला आहे. तसेच दाव्याची आकारणी देखील कशा प्रकारे केलेली आहे हे नमुद केलेले आहे. दावा मिळकतीचे कायदेशीर मुल्यांकन

करुन कोर्ट फि लावलेली आहे. कुळ कायदा कलम ७०—ब प्रमाणे कुळ ठरविण्याचा अधिकार तहसिलदार यांचा असला तरी मालकी हक्क ठरविण्याचा अधिकार न्यायालयाचा आहे.

४. वादी व प्रतिवादींतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(अ) नुसार प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की प्रस्तुतचा दावा हा मालकी हक्क जाहीर ठराव होवून मिळण्यासाठी व मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा मुदतीत आहे किंवा नाही हा वस्तुस्थिती व कायदा यातील संमिश्र प्रश्न आहे. त्यामुळे सद्य परिस्थितीमध्ये दावा मुदतीत आहे किंवा नाही ही बाब पुरावा अभिलेखावर आल्यानंतर स्पष्ट होणार आहे. त्याबाबत कोणताही निष्कर्ष आता काढता येणार नाही.

६. दावा दाखल करण्यासाठी काय कारणे झाली हे पॅरा क्र. ८ मध्ये नमुद केलेले आहे. त्यामुळे दावा दाखल करण्यास कारण घडलेले नाही व ते नमुद केलेले नाही असे म्हणणे योग्य होणार नाही. कुळ कायदा कलम ७०—ब मधील तरतुदींचा विचार करता कुळ म्हणून ठरवायचे असल्यास योग्य ती पुर्तता करावी लागते. परंतु सदर दाव्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये कुळ ठरवण्याबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत दावा कुळ कोण आहे याबाबत निर्णय देता येणार नाही.

७. वादी खालील न्यायनिर्णयांवर विसंबून राहीले आहे.

१) १९९९(३) All M R 414

२) २०१०(२) All M R 461

३) २००९(६) All M R 238

४) S C Civil Appeal No. 1848 of 2022.

५) AIR 2006 Supreme Court 1828.

वरील सर्व न्यायनिर्णय व प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती यामध्ये

साम्य असल्याने ते न्यायनिर्णय या प्रकरणात लागू होतात.

**८.** दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश ७ नियम ११ मधील तरतुदीनुसार प्रस्तुत अर्जाचा विचार केला असता असे दिसून येते की, दावा मिळकत ही शेत मिळकत असल्याने तिची आकारणी योग्य प्रकारे केलेली आहे व त्यावरील कोर्ट फि स्टॅम्प दिलेले आहे. तसेच दावा मुदतीत आहे किंवा नाही हे अभिलेखावर पुरावा आल्याशिवाय स्पष्ट होणार नाही. त्यामुळे दावा या अर्जावर विसंबून राहून फेटाळता येणार नाही. दाव्या मध्ये दावा दाखल करण्यास काय कारण घडले याचा देखील उल्लेख केलेला आहे. मुंबई कुळ कायदा कलम ८५ मधील तरतुदीचा विचार करता असे दिसून येते की, केवळ कुळ ठरविण्याबाबत दिवाणी न्यायालयास अधिकार नाही. परंतु कब्जा व मालकी हक्क ठरविण्याचा अधिकार या न्यायालयाला आहे. या सर्व बाबींचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करणे आवश्यक आहे.

**९.** सदरचा दावा हा गुणदोषावर चालल्यानंतर वादातील मुद्दे निकाली होणार आहेत. अश्या परिस्थितीत दाव्याचा विषयाचा विचार करता प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांच्याविरूध्द दावा दाखल करण्यास कारण घडलेले नाही असा निष्कर्ष नोंदवणे योग्य होणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** अर्ज निशाणी ४८ नामंजूर करणेत येतो.

SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2025.06.10 17:37:16 +0530

दिनांक :— १०.०६.२०२५.
स्थळ :— खालापुर.

**( एस.एस.देशमुख )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
खालापुर.

<u>**Certificate**</u>

I affirm that, the contents of the P.D.F. file order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Court Name | : | Smt. S. S. Deshmukh<br>CJJD & JMFC, Khalapur |
| Name of Steno | : | Shri. Rakesh S. Patil<br>Stenographer, Grade – III |
| Date of Order | : | 10/06/2025 |
| Order signed by P. O. On | : | 10/06/2025 |
| Date of PDF & Order uploaded on | : | 10/06/2025 |